# महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण

३०५, शासकीय तंत्र निकेतन इमारत, खेरवाडी,
अली यावर जंग मार्ग, वांद्रे, मुंबई - ४०० ०५१

दूरध्वनी : ०२२ - २६४७ ६०३७
फॅक्स : ०२२ - २६४७ ६०३७

वेबसाईट : sspnsamiti.gov.in
ईमेल : sspnsamiti@yahoo.com


क्र.संकिर्ण १६१७/प्र.क्र. १२९/प्रनिप्रा दि. ४/१०/२०१७

प्रति,
प्राचार्य/अधिष्ठाता,
विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था
महाराष्ट्र राज्य

विषय : **शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करिता प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती विहीत प्रपत्रात सादर करण्याबाबत...**

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क) यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ च्या कलम ९(५) च्या तरतुदीनुसार प्रवेश मान्यतेचे प्रस्ताव संबंधित संचालकांकडून प्रमाणित करुन विहित वेळेत प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे मान्यतेसाठी सादर करणे बंधनकारक आहे. विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थांनी शैक्षणिक वर्षाच्या प्रवेशाच्या अंतिम तारखेनंतर १५ दिवसात प्रवेशित विद्यार्थ्यांच्या यादया संबंधीत संचालकांकडे सादर करण्याबाबत उक्त अधिनियमामध्ये तरतुद करण्यात आली आहे.

सर्व विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थांना कळविण्यात येते कि, सोबत आपणांशी संबंधित संचालनालयाकरिता विहीत केलेल्या प्रपत्रात, प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती संबंधीत संचालकांकडे विहीत कालावधीत तपासणीसाठी सादर करावी. **तसेच प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर विहीत मुदतीत व शक्य तितक्या लवकर ऑनलाईन सादर करावी, ही विनंती.**

आपला विश्वासू,

(स्वाक्षरी)

**(अशोक चौधरी)**
**कक्ष अधिकारी,**
**प्रवेश नियामक प्राधिकरण**

सोबत : संबंधित संचालनालयाशी निगडीत विहीत प्रपत्र

प्रत माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित, -

१. सर्व संचालक, तंत्रशिक्षण/उच्चशिक्षण/वैद्यकिय शिक्षण/कलाशिक्षण/आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांना त्यांच्याशी निगडीत विहीत प्रपत्राच्या प्रतीसह अग्रेषित
२. मे. विशुमंगल टेक्नोलॉजी प्रा. लि. पुणे यांनी सोबत जोडलेल्या सर्व विहीत प्रपत्रांनुसार आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
३. निवड नस्ती, प्रवेश नियामक प्राधिकरण